# अर्थपूर्ण

पुणे, वर्ष १, अंक ३, जानेवारी २०११ ₹३०

व्यक्ती, समाज आणि देशाच्या परिपूर्ण विकासासाठी...

स्वाभिमानी, आनंदी, परिपूर्ण जीवनाचा करू स्वीकार; बेरोजगारी, गुन्हेगारी, भ्रष्टाचार, दहशतवादाला देऊ नकार



# माझ्या देशाची कैफियत...

**यमाजी मालकर**
ymalkar@gmail.com

माझ्या मित्रांनी पाठविलेले तीन एसएसएम मी गेले वर्षभर जपून ठेवले आहेत. इनबॉक्समध्ये जपून ठेवावेत असेच ते आहेत. 'आपण भले आणि आपले काम भले' या वृत्तीपासून दूर राहण्यासाठी मला त्यांचा नेहमी उपयोग होतो. देशात काही विधायक आणि मुळातून बदल करण्यासाठी जी अस्वस्थता लागते, ती हे एसएसएम देतात. त्यातील आकडेवारीची शहानिशाही करायची आहे, मात्र मला माहीत आहे, की त्यात निश्चित काही तथ्य आहे. एसएसएम वाचल्यावर तुम्हीही माझ्याशी सहमत व्हाल.

पहिला एसएसएम असा आहेः भारतीय गरीब आहेत, मात्र भारत हा गरीब देश नव्हे, हे वाक्य आहे स्वीस बँकेच्या एका संचालकाचे. त्याच्या म्हणण्यानुसार स्वीस बँकेत श्रीमंत भारतीयांनी दोन लाख ऐंशी हजार कोटी रुपये ठेवलेले आहेत. हा पैसा भारतातच वापरला गेला तर पुढील ३० वर्षांचे अर्थसंकल्प करविरहित करता येतील. रोजगारवाढीसाठी वापरला गेल्यास ६० कोटी भारतीयांना रोजगार मिळेल. सर्व भारतीय मुलांना मोफत शिक्षण देता येईल. दिल्लीपर्यंत येणारे सर्व मार्ग चौपदरी करता येतील. भारतीयांना मोफत वीजपुरवठा करता येईल असे ५०० वीजप्रकल्प उभे करता येतील. प्रत्येक भारतीय नागरिकाला पुढील ६० वर्षे महिन्याला दोन हजार रुपये देता येतील किंवा जागतिक बँकेच्या कोणत्याही कर्जाची गरज राहणार नाही. एसएसएममध्ये पुढे म्हटले होते, आपल्या देशातील राजकीय नेते, श्रीमंत उद्योगपती आणि भ्रष्ट अधिकाऱ्यांनी किती पैसा अडवून ठेवला आहे पाहा. देशाला नागवणाऱ्या या शक्तींविरोधात लढण्यासाठी सज्ज व्हा.

दुसरा एसएसएम असा आहे : अमेरिकेतील ३८ टक्के डॉक्टर आणि १२ टक्के शास्त्रज्ञ, नासामधील ३६ टक्के शास्त्रज्ञ, मायक्रोसॉफ्टचे ३४ टक्के आणि आयबीएमचे २८ टक्के तंत्रज्ञ मूळचे भारतीय आहेत. या महान देशातील माणसेही तेवढीच महान आहेत. या सर्वांनी भारताच्या उन्नतीसाठी काम केले असते तर भारत अमेरिकेशी स्पर्धा करून आजच एक प्रगत राष्ट्र म्हणून दिमाखाने जगात वावरत असता.

तिसरा एसएसएम असा आहेः आपण आज अशा देशात राहत आहोत, जेथे ॲम्ब्युलन्स किंवा पोलिसांच्या गाडीपेक्षा पिझ्झा घरात लवकर पोचतो, जेथे मोटारीसाठी ८ टक्के तर शिक्षणासाठी १२ टक्क्यांनी कर्ज मिळते, जेथे तांदूळ ४० रुपये किलो दराने विकत घ्यावे लागतात, पण मोबाईल फोनचे सिमकार्ड मोफत मिळू शकते, जेथे कोट्यधीश क्रिकेटची अख्खी टीमच विकत घेतात मात्र देशबांधवांच्या कल्याणासाठी त्यांच्याकडे पैसा नाही, जेथे पादत्राणे एसी शोरूममध्ये मिळतात, पण ज्याद्वारे पौष्टिक अन्न आपण खातो तो भाजीपाला फुटपाथवर विकला जातो, जेथे अन्नधान्य गोदामांमध्ये सडते किंवा त्याला उंदीर खातात आणि त्याच वेळी देशात कुपोषणामुळे हजारो मृत्युमुखी पडतात, जेथे जगातल्या महागड्या मोटारी खरेदी करणाऱ्यांची जणू स्पर्धा लागली आहे मात्र त्या चालविण्यासाठी चांगल्या रस्त्यांचा शोध घ्यावा लागतो, जेथे केवळ आर्थिक चतुराईच्या जोरावर काही लोक कोट्यवधी रुपये कमावतात मात्र देशाचे उदरभरण करणाऱ्या शेतकरी वर्गातील काही जणांवर आत्महत्या करण्याची वेळ येते, जेथे स्वच्छतागृहांपेक्षा मोबाईल फोनची संख्या जास्त आहे, जेथे आजही सार्वजनिक वाहतुकीपेक्षा खासगी वाहतुकीचे लाड केले जातात.

या तीन एसएसएममध्ये काही प्रमाणात अतिशोक्ती आहे, हे सहजच लक्षात येते. मात्र ही स्थिती आपण नाकारू शकत नाही. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे नागरिकांच्या मनातील अस्वस्थता त्यातून व्यक्त होते आहे, ज्याकडे अजिबात दुर्लक्ष करून चालणार नाही. आज हे एसएसएम आठवण्याचे कारण वाढत्या महागाईने देशात सध्या जो धुमाकूळ घातला आहे आणि त्याविषयी जे उलटसुलट बोलले जाते आहे, ती परिस्थिती. राज्यकारभार सांभाळणाऱ्या धुरीणांना अर्थशास्त्र आणि नियोजनाचे अधिक ज्ञान असणार, हे आपण मान्यच केले आहे. ते त्यांच्याकडे आहेच. मात्र त्या ज्ञानाचा वापर सध्या कशासाठी होतो आहे, हे आपण सर्वांनी विचारण्याची वेळ आली आहे.

आर्थिक नियोजनाची दिशा आणि प्राधान्यक्रम हेच राहणार असतील तर देशाचा विकास अशाच विसंगत पद्धतीने होत राहणार आहे. आणखी काही वर्षांनी या एसएसएममध्ये १०० टक्के तथ्य असल्याचे आपल्या लक्षात येईल. आता आपल्या देशाला एक व्यवस्था म्हणून काही मूलभूत बदलांची गरज आहे, त्या बदलांचा आग्रह जोपर्यंत धरला जात नाही तोपर्यंत दैनंदिन आणि देशापुढील कोणत्याही प्रश्नांना समाधानकारक

उत्तरे मिळणार नाहीत. तात्पुरती उत्तरे शोधताना लाखोंची आयुष्य करपून जातील. लाखोंची संपून जातील. संपत्ती तयार होत नाही म्हणून नोटा छापण्याचा निर्णय घेऊन प्रश्न सोडवल्याच्या बढाया मारणे जेवढे आत्मघातकी आहे, तेवढेच ही तात्पुरती उत्तरे आत्मघातकी आहेत. आजचे दुखणे उद्यावर ढकलल्याने रोग बरा होत नाही. त्याला मुळातूनच बरे करावे लागते, नाहीतर तो जिवावर बेततो. आजचे मोजक्या लोकांचे हितसंबंध साधणारे, नफेखोरीला चटावलेले आणि प्रगत देशांच्या इशाऱ्यावर नाचणारे आर्थिक व्यवहार असे १२० कोटी भारतीयांच्या मुळावर उठले आहेत. १५० वर्षांच्या पारतंत्र्यात इंग्रजांनी या देशाला लुटले, आता आमच्याच लोकांचा वापर करून पुन्हा एकदा देशाची लूट चालली आहे. ही लूट इतकी सर्वव्यापी आहे की आजच्या व्यवस्थेत स्वतःला सुरक्षित समजणारा कधी रस्त्यावर येईल, याचा भरवसा राहिलेला नाही. त्यामुळे प्रश्न सर्वांचा आहे आणि त्यासाठी सर्वांनी प्रयत्न करायला हवेत. 'अर्थपूर्ण'चे हे व्यासपीठ त्यासाठी आहे.

पहिल्या दोन अंकांचे स्वागत आपण केलेत, त्याबद्दल धन्यवाद. जो जो या प्रवाहाच्या संपर्कात येतो आहे, तो तो त्यात सामील होतो आहे, हे अधिक महत्त्वाचे. अर्थपूर्ण जीवनाचा प्रवास एका दिवसात, एका महिन्यात किंवा एका वर्षात करता येणार नाही. ही एक सातत्याने चालणारी वाटचाल आहे. तिचे आकलन अधिकाधिक देशबांधवांपर्यंत पोचावे आणि हाच राजमार्ग बनावा, यासाठी प्रयत्नशील राहूयात.





